शासकीय कर्मचाऱ्यांस अत्युत्कृष्ट कामानिमित्त आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याबाबत.

45

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०८३/सीएन-१६-आठ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ सप्टेंबर १९८३.

वाचा :- (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७७-सीएन-१२७-७९-आठ, दिनांक ४ डिसेंबर १९७९.

(२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०८०-१३३३-सीएन-११८-आठ, दिनांक २४ सप्टेंबर १९८०.

परिपत्रक :- ज्या शासकीय कर्मचाऱ्याचे काम अत्युत्कृष्ट आहे अशा कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबत शासनाने वेळोवेळी आदेश निर्गमित केलेले आहेत. तथापि शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्यासाठी कर्मचाऱ्यांची निवड करताना त्यांचा पगार व वेतनश्रेणी यांचा विचार न करताच निवड केली जाते आणि एक किंवा दोन आगाऊ वेतनवाढी मंजूर केल्या जातात. परिणामतः काही प्रकरणांमध्ये आगाऊ वेतनवाढी मंजूर केल्यासंबंधीच्या आदेशांची जेव्हा प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात येते तेव्हा असे आढळून येते की, असा कर्मचारी वेतनश्रेणीच्या शेवटच्या टप्प्यास पोहोचण्यापूर्वीच ३-४ महिने आधीच त्याला एक किंवा दोन आगाऊ वेतनवाढी मंजूर झालेल्या असतात. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये संबंधित कर्मचाऱ्यास आगाऊ वेतनवाढीचा आर्थिक लाभ फक्त ३-४ महिनेच मिळतो. तसेच शासन निर्णय, दिनांक ४ डिसेंबर १९७९ मधील परिच्छेद ३ मधील "अ" व "ब" मधील तरतुदींचा लाभ मिळण्यापासून देखील तो वंचित होतो.

२. शासनाच्या असेही निदर्शनास आले आहे की, काही व्यक्तींना पदोन्नती दिल्यानंतरही खालच्या पदांमध्ये आगाऊ वेतनवाढी मंजूर केल्या जातात. अशा प्रकरणांमध्ये संबंधित व्यक्तींना, शासन निर्णय, दिनांक २४ सप्टेंबर १९८० मधील परिच्छेद २ मधील उप भाग १ व २ मधील तरतुदींनुसार वेतन निश्चित करुन देखील मंजूर झालेल्या आगाऊ वेतनवाढीचा प्रत्यक्षात काहीच आर्थिक लाभ होत नाही. कारण ह्या वेतनवाढी मिळाल्यावर मिळणारे वेतन व वेतनवाढी न मिळता, पदोन्नत झाल्यानंतर मिळणारे वेतन यामध्ये काहीच फरक पडत नाही.

३. वरील प्रकारची प्रकरणे यापुढे होऊ नयेत यासाठी शासन असे आदेश देत आहे की, आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव विचारात घेताना खाली नमूद केलेल्या बाबी विचारात घ्याव्यात:-

१) संबंधित कर्मचाऱ्याने धारण केलेल्या पदावरील त्याची एकूण सेवा.

(२) त्याने धारण केलेल्या पदावरील वेतनश्रेणीमधील त्याचे वेतन कोणत्या टप्प्यावर आहे आणि आगाऊ वेतनवाढ/वाढी मंजूर केल्या असता त्याला प्रत्यक्ष आर्थिक लाभ होईल किंवा नाही.

(३) एखादा कर्मचारी, त्याने धारण केलेल्या पदावरुन वरच्या पदावर १ ऑक्टोबर पूर्वी पदोन्नत झाला असेल, परंतु त्याचे खालच्या पदावरील काम अत्युत्कृष्ट असून, तो आगाऊ वेतनवाढ/वाढी मंजूर करण्यास पात्र असेल तर, आगाऊ वेतनवाढ/वाढी मंजूर करण्यापूर्वी, त्याला आगाऊ वेतनवाढीचा आर्थिक लाभ मिळेल किंवा नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व. अं. कोटेश्वर,
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
2 DEC 1983

4588